# ''नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा कलकत्ता ते बर्लिन प्रवास''

**डॉ. अर्जुन डी. म्हाळुंगेकर** इतिहास विभाग प्रमुख, डी.के.ए.एस्.सी. कॉलेज, इचलकरंजी, मो.९९६०७८८२६८

**सारांश** -आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये अनेक महान क्रांतीकारक होऊन गेले. त्यांनी भारतातून इंग्रजांची अन्यायी राजवट संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्नांची पराकष्टा केली. अनेक महान क्रांतीकारकांचे महान कार्ये होते. पण यापेक्षाही नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे कार्ये म्हणजे प्रखर देशभक्तीचे आणि ते निश्चीतच भारताच्या स्वातंत्र्यासाठी होते. अगदी लहान वयापासून म्हणजेच शालेयदशेपासून भारताच्या स्वातंत्र्याचे वारे त्यांच्या अंगामध्ये वहात होते. भारतीय माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेत असतानाच ते भारताच्या स्वातंत्र प्रेमाच्या विचारांनी ग्रासले होते. आय.सी.एस् च्या परीक्षेनंतर त्यांना प्रशासनातील मोठ्या हुद्दयाची नोकरी मिळत होती. पण परकीय सत्तेच्या सेवेत काम करण्याचे त्यांनी मान्य केले नाही. तर भारतमातेची सेवा करण्याचे मान्य केले. ते एक जहाल क्रांतीकारी विचारांचे असल्याने त्यांना अनेक वेळा तुरूंगात जावे लागले. मवाळ राष्ट्रपुरुषांनी ब्रिटीश सरकारबरोबर शांततामय व अहिंसक मार्गानी वाटाघाटी कराव्यात असा अग्रह धरला होता, परंतु नेताजींना मवाळ राजकारण मुळीच पसंत नव्हते. अशा राजकारणातून ब्रिटीश सरकारवर काही परिणाम होणार नाही तेंव्हा त्यांनी जशास तसे या मार्गाचा अवलंब करण्याचे ठरविले. त्यासाठी अन्य देशांची मदत घेण्याचे ठरविले आणि योग्य संधी साधून जागतिक दुसरे महायुध्द चालु असताना स्वातंत्र्याच्या ध्येयाने झपाटलेल्या सुभाषचंद्र बोस यांनी घरच्या बंदीवासातून स्वत:ची सुटका करून घेतली आणि यशस्वीपणे ते भारताच्या बाहेर पडले. अफगाणीस्तानमधून रशियन हद्दीतून त्यांनी जर्मनीतील बर्लिन शहरामध्ये प्रवेश केला.

**प्रस्तावना** -आधुनिक भारताच्या कालखंडात अनेक राष्ट्रपुरुष होऊन गेले. महात्मा गांधीजी, पंडित जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद, वल्लभाई पटेल या महान राष्ट्रपुरुषांचे महान कार्ये होते. पण यापेक्षाही नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे कार्ये म्हणजे प्रखर देशभक्तीचे, प्रामाणिक व निश्चितपणे भारताच्या स्वातंत्र्यासाठी होते. तडजोडीच्या मवाळ राजकारणावर त्यांचा बिल्कुल विश्वास नव्हता. या धोरणाचा अवलंब केला तर सरकारकडून भारताला स्वातंत्र्य लवकर मिळू शकणार नाही. त्यासाठी जहाल मार्गाचा अवलंब करूनच देशाला स्वातंत्र प्राप्त करून घेतले पाहिजे. गोगलगाईच्या चालीचे राजकारण त्यांना मुळीच पसंत नव्हते. त्यांचा सरकारवर काही परिणाम होणार नाही. त्यासाठी सुभाषचंद्र बोसनी वेगळ्या मार्गाचा अवलंब करून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

**भारतीय स्वातंत्र्याबाबत विचार** -२३ जानेवारी १८९७ रोजी कटक येथे नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म झाला.[१] वडील जानकीनाथ बोस एक नामवंत वकील तर आई प्रभावती देवी यांचे ते नववे अपत्य होय. ''विद्येत निपुण, महापराक्रमी, दुष्मनांना पाणी पाजणारा, जननी व जन्मभूमीचा कंठमणी, इतिहासातील अमर विजेता.'' या भविष्य वाणीने रायबहादूर जानकीनाथांचे खानदान धन्य झाले. आकाशाला गवसणी घालणारा वीराग्रणी या घराण्यात जन्माला आला. त्यांचे नाव सुभाषचंद्र.[२] केवळ वडिलांच्या आग्रहामुळेच इंग्लंडला जावून आय.सी.एस्. चे उच्च शिक्षण घेण्याचे आव्हान त्यांनी स्विकारले. स्वातंत्र्याची आकांक्षा बाळगणारा थोर देशभक्त आय.सी.एस्.चा अभ्यास मोठ्या निष्ठेने करत होता, अन् ती परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर सरकारी कोणतेही अधिकार पद न स्विकारता देशाच्या स्वातंत्र्याचे धुरिणत्व तो स्वीकारणार होता. आखेर तो क्षण आला. आय.सी.एस्. चा निकाल जाहीर झाला आणि सुभाष पहिल्या श्रेणीत पास झाला. त्याचवेळी त्यांनी भारताच्या राज्य सरकारचे सचिव लॉर्ड लिरंग यांना पत्र पाठविले- ''मी कधीही परकीय सत्तेच्या सेवेत काम करणार नाही.''[३] या अभुतपूर्व घटनेने इंग्लंड आणि बंगालमध्ये वादळ निर्माण झाले. सुभाषने आय.सी.एस्. पदाचा राजीनामा दिला, हे कळताच वडिलांना धक्का बसला. सुभाषने वडिलांना कळविले- ''इंग्रजी सत्तेशी सम्राटाशी निष्ठावान राहण्याची शपथ घेणे मला मान्य नाही.'' मी माझी कौटुंबिक कर्तव्य पार पाडली आहेत. कुटुंबापेक्षा समाज, देश या विषयीची माझी कर्तव्ये अपूरी आहेत ती पूर्ण करणे हेच माझ्या जीवनाचे उद्दिष्ट आहे. सुभाष इंग्लंडमधून भारतात आले. प्रथम त्यांनी महात्मा गांधींची मुंबई येथे भेट घेतली त्यानंतर भारत मातेच्या मुक्ततेसाठी देशबंधू चित्तरंजन दास यांचे सहकारी म्हणून सुभाषबाबूंनी आपल्या राजकीय जीवनाला शुभारंभ केला.

हिंदु आणि मुसलमान जनतेच्या मागणीनुसार नेताजींनी ६ जून १९४० रोजी आश्चर्यकारक घोषणा केली की, प्रत्येक प्रांतात एक भारतीय स्वतंत्र सरकार स्थापन करण्यात येत असून, या सरकारला सार्वभौमत्वाचे अधिकार राहतील, त्यांच्या या घोषणेमुळे मवाळ-ब्रिटिश सरकार गोंधळात पडले. याचाच परिणाम म्हणून ब्रिटिश सरकारने कठोर धोरणाचा अवलंब करून अनेक नेत्यांची धरपकड सुरू केली. त्यानुसार २ जुलै १९४० रोजी नेताजीवर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांच्या राहत्या घरी अटक केली.[४] हा त्यांचा तुरूंगातील आकरावा कारावास होता. त्यांनी सरकारच्या अशा अन्यायी धोरणाविरूध्द प्राणांतीक उपोषणाला सुरूवात केली. तुरूंगातच त्यांची तब्बेत बिघडल्याने भारतातील लोकक्षोभ उफाळून आला. याचे बरे वाईट परिणाम होवू नयेत म्हणून सरकारने त्यांची कारावासातून मुक्तता केली, आणि त्यांच्या कलकत्ता येथील राहत्या घरी त्यांना स्थानबध्द करून त्यांच्या निवासस्थानाभोवती पोलीसांचा कडक पहारा ठेवला.[५]

बंगाल सरकारने सुभाषबाबूंना त्याच्या घरी नजरकैदेत ठेवून त्यांच्यावर खटला भरला होता. त्याची सुनावनी २६ जानेवारी १९४१ पासून सुरू होणार होती.[६] त्या खटल्यात आपल्याला शिक्षा होईल आणि किमान काही वर्षे तरी तुरूंगात खितपत पडावे लागेल, याची त्यांना कल्पना होती. असे काही घडू नये म्हणून त्यांनी आपल्या मनाशी संकल्पीत साहसाची आखणी केली ती म्हणजे इंग्रजांच्या कैदेतून सुटका करून जर्मनीला जाण्याची, ज्याप्रमाणे शिवाजी महाराजांनी औरंगजेबाच्या आग्रा येथील कैदेतून आपली मुक्तता करून घेण्यासाठी जे प्रयत्न केले त्या प्रमाणे नेताजी सुभाषचंद्र यांनी इंग्रज सरकारच्या कैदेतून आपली सुटका करून घेतल

**कलकत्ता ते बर्लिन प्रवास** -सुभाषचंद्र बोस ३८/२, एल्जिन रोड कलकत्ता या आपल्या निवासस्थानी बसून जर्मनीला जाण्याची योजना आखत होते. त्यासाठी त्यांनी जाहीर केले की, निवडक मंडळीच्या शिवाय मी कोणालाही भेटणार नाही. त्यांनी आपला पुतण्या म्हणजे मोठे भाऊ शरदबाबू यांचा मुलगा शिशिर याला बोलावून घेवून विचारले, 'आमार एकता काज कोरते परबे ? केऊ किंतु जानबे ना'[८] (म्हणजेच माझे एक काम करशील ? परंतु कोणाला कळता कामा नये.) त्यांना शिशिरने मनापासून होकार दिला. एक नवीन अग्नीदिव्य पेलायला भारताचा स्वातंत्र्याचा महानायक सिद्ध झाला होता. सुभाषचंद्र बोस प्रेसिडेन्सी तुरूंगातून घरी आल्यापासून खोली बाहेर नव्हते. त्यांची दाढी वाढलेली होती. त्यामुळे ते ओळखू शकत नव्हते. देशांतर आणि वेशांतराची योजना मनोमन तयार झाली होती. त्यामुळे त्यांनी पेशावर येथील नवजवान भारत सभेचे प्रमुख कार्यकर्ते अकबरशहांना बोलावून घेतले.[९] त्यांनीच प्रवासात लागणाऱ्या सर्व वस्तू बाजारातून खरेदी करून आणल्या होत्या. ते जेवढे कल्पक तेवढेच धाडशी होते. सुभाषबाबू जर्मनीला जाणार याची शिशिर व त्यांचे मोठे भाऊ शरदबाबू या शिवाय कोणालाही कल्पना नव्हती. त्यांनी फार मोठी गुप्तता पाळली होती आणि ती त्यांच्या जीवाच्या दृष्टीने महत्त्वाची होती. घरातून बाहेर पडण्यापूर्वी त्यांनी एकदा घरातील लोकांच्यावर नजर टाकली, वृध्द मातेच्या जीवाचीही त्यांनी पर्वा केली नाही. कारण भारतमातेच्या मुक्ततेसाठी अखेरचे युद्ध करण्यासाठी या महानायकाचे विराट अग्नीदिव्य सुरू होते. एक मुर्तीमंत

पठाण बनून म्हणजेच 'महंमद झियाउद्दीन' या नावाने रात्रीचे १ वाजता अगदी सावधगीरीने घराबाहेर पडले. यापूर्वीच त्यांनी 'महंमद झियाउद्दीन' या नावाने व्हिजिटींग कार्ड तयार करून घेतले होते.[१०]

शिशिरची मोटार कलकत्ता सोडून बराडीच्या दिशेने धावू लागली. साम्राज्यसत्तेच्या संतापाचा विषय झालेला हा देशभक्त आपल्या हातातून निसटला याचा कलकत्याच्या पोलीस प्रमुखांना सुगावा लागलेला नव्हता. कलकत्त्याकडून ते हावडा स्थानकावर जाणार पण तेथे साध्या वेशातल्या सरकारी गुप्तचरांची वर्दळ असल्याने ते गोमोह सारख्या लहान स्थानकाहून दिल्लीकडे प्रयाण केले. तेथून फ्रॉटीयर मेल पकडून त्यांनी पेशावरकडे प्रयाण केले. आणि पुढे काही दिवसांनी म्हणजेच २७ जानेवारीच्या कलकल्यामधील वर्तमान पत्रामध्ये पहिल्याच पानावर ठळक अक्षरात बातमी होती, ती म्हणजे 'सुभाष बोस यांचे अज्ञान स्थळी प्रयाण'.[११]

महंमद झियाउद्दीनचा पेशावरपासूनचा थोडासा प्रवास मोटारीतून झाला, त्यानंतर पहाडी प्रदेशातून पायी प्रवास, थंडीचे दिवस. ती थंडी म्हणजे सारे शरीर गारठवून टाकणारी, पाय वाट, अरूंद रस्ता, मोठमोठे दगड, झाडी झुडपे, काळोख, मध्येच दमछाक करणारी चढण तर लगेच भोवळ आणणारी उतरण केंव्हा तोल जाईल हे सांगता येवू नये इतकी नागमोडी वळण. असा अज्ञातवासाचा प्रवास करत अफगाणीस्तानच्या सिमेपर्यंत पोहचले. तेथून पठाणी मुलुख सुरू. सुभाषबाबु गंभीर झाले, त्यांनी भारत मातेच्या हद्दीतील माती उचलून भस्मासारखी कपाळाला लावली आणि डोळे मिटून हात जोडले. अद्याप हिंदुस्थान सरकारला सुभाषबाबू कोठे आहेत याची माहिती समजलेली नव्हती.

महंमद झियाउद्दीन २७ जानेवारी सकाळी आकरा वाजता काबूल मध्ये येवून पोहचले. तेथे काही दिवस दिवसाला १ रुपया भाड्याने राहात होते. ती वस्ती घाणेरडी, सततची दुर्गंधी, पण तेथे असणाऱ्या रखवालदार (फौजदार) याच्या त्रासामुळे तेथून ते बाहेर पडले आणि हरिकिशनचे मित्र उत्तमचंद मल्होत्रा हे काबूलमध्ये व्यापार करत होते. त्याची माहिती मिळवून तेथील काही दिवसाच्या मुक्कामात ब्रिटिश दुतावासाला आपला सुगावा लागू न देता रशियन व जर्मन दुतावासाशी संपर्क साधू लागले. रशियन दुतावास आपल्या संबंधी अगत्य दाखवतील अशी त्यांना आशा होती, पण ती खोटी ठरली आणि त्यांना वार्लेन पर्यंत पोहचविण्याची जबाबदारी इटालीयन दुतावासाने पार पाडली. त्यानुसार २८ मार्च १९४१ रोजी ऑरलंडो मॅझोटा या इटालियन नावाने ते बर्लिनमध्ये पोहचले.[१२] हा सारा अज्ञातातला प्रवास करताना त्यांनी किती मोठा धोका पत्करलेला होता, प्रचंड धाडस, किती देश प्रेम, प्राथमिक सामर्थ्य कोणताही महापुरुष संरक्षणाकडे बघून देशासाठी एवढे धाडस करू शकत नाही. तर ज्याच्या ठायी निष्ठा असेल, ज्याच्या अंगी स्वातंत्र प्रेम असेल, तरच तो माणूस देशासाठी एवढा मोठा धोका पत्करायला तयार होतो. पुढे जेंव्हा बर्लिनमध्ये हिटलरची सुभाषबाबूंची भेट झाली तेंव्हा हिटलरने त्यांचे मनपूर्वक स्वागत केले. ''आपण इथं मोठ्या शर्थीनं-शौर्यानं येऊन पोहचलात याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन.

मार्च १९४१ सुभाषबाबू जर्मनीमध्ये पोहचले. तेथून एक वर्षाच्या काळावधीत तेथील अनेक वरीष्ठ अधिकारी त्यांना भेटले. त्यांच्यापैकी अनेकांशी त्यांचा स्नेहसंबंधी जूळून आला होतो. तरीही त्यांच्या मनामध्ये सारखी रूखरूख होती, ती म्हणजे जर्मनीमध्ये प्रवेश करून वर्षे पूर्ण होत आहे. या कालावधीत अद्याप हिटलरची भेट व त्यांच्याशी बोलण्याचा योग आलेला नव्हता. तो योग २८ मे १९४२ मध्ये आला. विल्यम केपलर यांनी सभाष बाबूंना सांगितले. हिटलरला भेटण्याची उद्याची वेळ रास्टेनबर्ग येथे ठरलेली आहे. त्यानुसार सुभाषबाबु यांनी रिबेन्ट्रॉपसमवेत हिटलरच्या अभ्यासिकेत प्रवेश केला. खोली तशी साधीच होती. दोन टेबल पाच-सहा खुर्च्या तसेच भिंतीवर दोन नकाशे टांगलेले होते- एक युरोपचा आणि दुसरा फक्त रशियाचा. हिटलर आणि सुभाषचंद्र बोस यांच्यात प्रारंभीचे औपचारिक बोलणे पूर्ण झाल्यावर हिटलरने सुभाषबाबूंना नकाशा जवळ नेले आणि ते सांगू लागले- ''सध्या आमचे सैन्य रशियाच्या दक्षिण भागापर्यंत पोहचले आहेत. तेथून पुढचा टप्पा गाठायला किती काळ लागेल हे सांगता येत नाही. तेथून आम्ही हिंदुस्थानच्या सिमेपर्यंत जायचे म्हटले तरी ते अंतर बरेच आहे. तेंव्हा पुढचे वेळापत्रक आत्ताच ठरविता येणार नाही.'' आमच्यापेक्षा जपानचे सैन्य हिंदुस्थानच्या खूपच जवळ जावून पोहचलेले आहेत. त्यामुळे जर्मनीपेक्षा जपानच तुम्हाला अधिक उपयोगी पडेल. जपानी नेते आपण होवून तुम्हाला मदत करायला तयार होतील. पाहिजे असेल तर मी स्वत: त्यांच्याशी या संबंधात बोलेन.[१३] अर्धा तास वेळ ठरलेली होती, पण बोलता बोलता एक तास होऊन गेला होता. ती भेट म्हणजे सुभाषबाबूंच्या पुढील कामगीरीसाठी महत्त्वपूर्ण ठरली. यानंतर सुभाषचंद्रबोस यांनी हिटलरचे आभार मानून ते त्यांच्या कचेरीतून समाधान मुद्रेने बाहेर पडले. कारण त्यांना जपानकडे जाण्याची ओढ लागलेली होती आणि हिटलरच्या भेटीनंतर ती अधिकच वाढली.

**निष्कर्ष** -हिंदुस्थानच्या स्वातंत्र लढ्यातील सुभाषचंद्र बोस हे महान क्रांतीकारक म्हणून जगभर त्यांची प्रसिध्दी झाली. इंग्रजांच्या कडेकोट पहाऱ्यातून त्यांनी आपली सहीसलामत सुटका करून अत्यंत रोमहर्षकपणे गुप्त होवून झियाउद्दीने नावाने त्यांनी भारतातून पलायन केले मुसोलीनी हिटलर अशा मोठ्या नेत्यांशी संपर्क प्रस्थापित केला. तेथून ते जपानला गेले, 'आझाद-हिंद-फौजेची' धुरा स्विकारली आणि हंगामी सरकार स्थापन करुन इंग्रज सरकारला धक्का दिला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी मोठे योगदान दिले आहे. ते निश्चितच प्रखर देशभक्तीचे व भारताच्या स्वातंत्र्यासाठीच होते.

**संदर्भ** -


१) भोसले, शिवाजीराव, 'दिपस्तंभ', चरित्रवनातील आनंद यात्रा, अक्षरब्रह्म प्रकाशन, पुणे, एप्रिल १९९४, पृ. ३८४

२) जोहारी, गजानन, 'सुभाषचंद्र बोस', सुरेश एजन्सी, पुणे, १९८५, पृ. ३२

३) जोहारी, गजानन, 'सुभाषचंद्र बोस', उपरोक्त, पृ. ३२

४) नेताजी सुभाषचंद्र बोस, 'अनुवाद - गौतम पंडित', उपरोक्त, पृ. ७

५) नेताजी सुभाषचंद्र बोस, 'अनुवाद - गौतम पंडित'', उपरोक्त, पृ. ७

६) वाळींबे, वि. स., 'सत्तावन ते सत्तेचाळीस', भाग-२, (स्वातंत्र्य लढ्याची संस्मरणीय कहानी), राजहंस प्रकाशन, पुणे, १ जानेवारी १९९७, पृ. ९७८

७) खेर, भा. द., 'महापुरुषांची महायात्रा', ज्ञानदा पब्लिकेशन्स प्रा. लि. पुणे, जानेवारी, १९९३, पृ. १२

८) दैनिक पुढारी, रविवार दि. ३ नोव्हेंबर, २००२

९) वाळींबे, वि. स. - 'सत्तावन्न ते सत्तेचाळीस', भाग-२, उपरोक्त, पृ. ९७८

१०) वाळींबे, वि. स. - उपरोक्त, पृ. ९७९

११) वाळींबे, वि. स. - उपरोक्त, पृ. ९८१

१२) खेर, भा. द. - महापुरुषांची महायात्रा, उपरोक्त, पृ. १२

१३) वाळींबे, वि. स., सत्तावन्न ते सत्तेचाळीस, भाग-२, उपरोक्त, पृ. १०००